स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (०२३१) २६९०८२९(O) २६९०६७९ (R) Secretary -२६९१४०५ (O) २६५६०४४ (R)
EPBX २६९६१०१,१०२,१०३, Fax -२६९०७५८ E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम./माध्य परीक्षा-२२/ 1038
कोल्हापूर.४१६००४.
दिनांक - १२/०७/२०२२ 13

प्रति,

मुख्याध्यापक,
हजरत मोहम्मद सुलेमान उर्दू हायस्कूल,
इस्लामपूर, ता,वाळवा,
जि.सांगली.

**विषय :- कोल्हापूर विभागीय मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून आपल्या शाळेची नियुक्ती केल्याबाबत..**

**संदर्भ :-** १. शिक्षणाधिकारी, सांगली यांचे जाक्र.जिपसां/माशिवि/आस्था-७/७७७३/२०२२ दि.०७/०७/२०२२ चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविणेत येते की, मंडळाच्या कामकाजाकरिता **वाळवा(११)** व **शिराळा(०९)** या दोन तालुक्यांचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून **आपल्या शाळेची नियुक्ती दि.०१/०८/२०२२ पासून पुढील तीन वर्षाकरीता** करण्यात येत आहे.

दोन तालुक्यातील सर्व शाळा/ क.महाविद्यालय प्रतिनिधींना मंडळाचे साहित्य वितरण केंद्रावर जमा करणे व साहित्य घेवून जाणे सोईचे व्हावे यासाठी प्रत्येक शाळेला रोटेशन प्रमाणे पुढील तीन वर्षासाठी मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून नियुक्ती देण्यात येते. तसेच शाळांच्या संख्येनुसार आपण केलेल्या कामकाजाचे मानधन व मंडळ कार्यालयात येणे-जाणे यासाठी प्रवासभत्ता मंडळाकडून त्या त्या वेळी अदा केला जाईल.

तरी उपरोक्त दोन तालुक्यांकरीता मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून **दि.०१/०८/२०२२** पासून पढील तीन वर्षाकरीता काम पहावे.

(डी.एस.पोवार),
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत माहितीसाठी - १.शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सांगली.**

**प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी -**

१.**मुख्याध्यापक, यशवंत हायस्कूल, इस्लापूर, ता,वाळवा, जि.सांगली.** यांना कळविण्यात येते की, आपण दि.३१/०७/२०२२ पर्यंत मंडळाचे वितरण केंद्र म्हणून काम पहावयाचे आहे. तद्नंतर दि.०१/०८/२०२२ पासून मंडळाने नव्याने नियुक्त केलेल्या उपरोक्त वितरण केंद्रास कामकाजाबद्दल आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य करावी.

२. **सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व क.महाविद्यालय, ता.वाळवा व ता. शिराळा** - उपरोक्त प्रमाणे दि.०१/०८/२०२२ पासून मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र हजरत मोहम्मद सुलेमान उर्दू हायस्कूल, इस्लामपूर, ता,वाळवा, जि.सांगली. हे असणार आहे त्यामुळे मंडळाचे साहित्य स्विकारण्यासाठी या नवीन वितरण केंद्रावर पाठविण्यात यावे.